## नियमित दिवाणी मुकदमा नं.१९/२०१६ मधील नि.५ वरील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकतीतील कब्जाभोग्यास हरकत अथवा अडथळा करु नये, अशी प्रतिवादी यांना तुर्तातुर्त ताकीद होणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ३९, नियम १ नुसार दाखल केला आहे.

२) वादी यांचे अर्जातील थोडक्यात कथन असे की, —

दावा मिळकत म्हणजेच मौजे आरवली, ता. वेंगुर्ला येथील सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.४ ही असून त्या मिळकतीचे विस्तृत वर्णन दावेचे व सदर अर्जाचे परिच्छेद नं.१ मध्ये नमूद केलेले आहे. सदर मिळकतीस यापुढे ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात आलेले आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकत ही त्यांचे मालकी—कब्जाभोग्याची असून त्यामध्ये त्यांचे मालकीची झाडे व एक विहिर देखील आहे. सदर दावा मिळकतीला लागून वादी यांचे मालकीची सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ ही मिळकत असून त्या मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी बेकायदेशीररित्या घर बांधलेले आहे व त्या घरासंदर्भात व इतर बांधकामाबाबत त्यांनी या न्यायालयाकडे नि.दि.मु.नं.२८/२०१४ हा दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे व त्या दावेमध्ये यातील वादी यांनी उलट मागणी दावा देखील दाखल केलेला आहे. अशी सर्व परिस्थिती असताना दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा कोणताही हक्कसंबंध नसताना ते वर नमूद दावेचा आधार घेवून वादी यांचे दावा मिळकतीमधील कब्जाभोग्यास हरकत—अडथळा करुन सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ व दावा मिळकतीत येणे—जाणेची वाट बंद करणेची धमकी देत आहेत तसेच दावा मिळकतीतील विहिरीवर देखील आपला हक्क उभारु पहात आहेत व तसे झालेस दावा मिळकतीतील वादी यांचे कब्जेवहिवाटीस बाधा उत्पन्न होणार आहे. त्यामुळे वादी यांनी, ते दावा मिळकतीचे मालक—कब्जेदार आहेत असे ठरवून मिळणेसाठी तसेच प्रतिवादी यांचेविरुध्द मनाईसाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. परंतू, सदर दावेचा निकाल होणेस बराच कालावधी जाणारा असलेने व तोपर्यंत दावा मिळकतीतील वादी यांचे कब्जाभोग्यास प्रतिवादी यांनी हरकत—अडथळा केलेस वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादी यांनी प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल करुन वर परिच्छेद नं.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे मागणी प्रार्थित केली आहे.

३) प्रतिवादी यांनी नि.१३ येथे आपले म्हणणे दाखल करुन सदर अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे.

प्रतिवादी यांनी केवळ दावा मिळकतीचे वर्णन बरोबर असलेचे नमूद करुन दावेतील इतर संपुर्ण विधाने नाकारलेली आहेत. त्यांचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादी यांचे कब्जाभोग्य

नाही तसेच दावा मिळकतीमध्ये नमूद केलेली विहिर ही प्रतिवादी यांनी स्वत: बांधलेली असून त्या विहिरीकडे वादी यांचा कसलाही व कोणताही हक्कसंबंध नाही. त्यांचे म्हणणेप्रमाणे वादी यांना दावा मिळकत व सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५, या मिळकती विक्रीत दयावयाच्या आहेत परंतू प्रतिवादी यांनी सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ याबाबत दाखल केलेला नि.दि.मु.नं.२८/२०१४ हा प्रलंबित असलेमुळे वादी यांना त्या मिळकती विक्री करता येत नाहीत त्यामुळे जाणूनबुजून त्यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. अशाप्रकारे प्रतिवादी यांचे म्हणणेनुसार दावा दाखल करणेस कारण घडलेले नसून दावेमध्ये अनावश्यक पक्षकारांना सामील केलेले असलेमुळे सदर दावेस पक्षकारांचे अपसंयोजन या तत्वाची बाधा येते. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करुन प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केली.

४) वादी यांचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे, दोन्ही बाजुंतर्फे दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले तसेच वादीतर्फे विधिज्ञ श्री. अेस्. अेन्. भणगे व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. अेस्. के. मराठे यांचा युक्तीवाद या सर्व बाबींचा विचार करता माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित होत असुन त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी दावा वादी यांचे लाभात आहे का? | अंशत: होकारार्थी. |
| २ | न्यायाचे समतोलत्व वादी यांचे बाजुने झुकत आहे का? | होकारार्थी. |
| ३ | मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिलेस वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का? | होकारार्थी. |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

५) **<u>मुद्दा कमांक १ ते ३ करिता</u> :—**

सदर तिन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असलेने व चर्चेसाठी सुलभ होणार असलेने ते एकत्रित विचाराधीन घेणेत आलेले आहेत.

६) मी सर्वप्रथम येथे ज्या बाबी दोन्ही पक्षकारांना मान्य आहेत त्या नमूद करतो. गाव मौजे आरवली येथील सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.४ ही मिळकत वादी यांचे मालकीची आहे व त्या मिळकतीस लागून सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ ही मिळकत आहे, याबाबत उभय पक्षकारांमध्ये दुमत नाही. ही बाब देखील उभय पक्षकारांना मान्य आहे की, सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ या मिळकतीतील बांधकामाबाबत प्रतिवादी नं.१ याने नि.दि.मु.नं.२८/२०१४ हा दावा दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे.

७)		वादीतर्फे विधिज्ञ यांनी याकामी असा युक्तीवाद केला की, सध्यस्थितीत सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ याबाबत प्रतिवादी यांनी जरी दावा दाखल केलेला असला तरी दावा मिळकतीकडे त्यांचा कसलाही हक्कसंबंध नसताना देखील ते दावा मिळकतीमध्ये असलेले विहिरीवर आपला हक्क उभारुन दावा मिळकत व सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ या मिळकतीत येणे–जाणेची वाट बंद करुन प्रतिवादी हे वादी यांचे कब्जेभोग्यास हरकत–अडथळा करणेचा प्रयत्न करत असलेने त्यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद करणे अत्यंत आवश्यक आहे. याउलट, प्रतिवादी यांचेतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये विहिर अस्तित्वात नसून ती विहिर सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ मध्ये प्रतिवादी यांचे कब्जेवहिवाटीत असलेल्या सुमारे ५ गुंठे क्षेत्रामध्ये येत असलेने व ती विहिर प्रतिवादी यांनी बांधलेली असलेने त्या विहिरीकडे वादी यांचा कोणताही हक्कसंबंध नाही. त्यामुळे त्याबाबत वादी यांना मनाई देता येणार नाही. पुढे त्यांनी असा देखील युक्तीवाद केला की, वादी यांचे म्हणणेप्रमाणे प्रतिवादी नं.२ ते ५ यांनी वादी यांना हरकत केलेली नसलेने त्यांचेविरुध्द देखील मनाईचा आदेश करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

८)		दोन्ही विधिज्ञ यांचा वरील युक्तीवादाचा विचार केला तसेच वर नमूद साधकबाधक बाबींचा विचार केला असता ही बाब स्पष्ट होते की, सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.४ या मिळकतीकडे प्रतिवादी यांचा कोणताही हक्कसंबंध नाही अगर त्यांचे तसे म्हणणे देखील नाही. ही बाब उभय पक्षकारांना मान्य आहे की, सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ मधील ५ गुंठे क्षेत्राबाबत व त्यामध्ये असलेले बांधकामाबाबत त्यांचेमध्ये वाद आहे. तसेच प्रस्तुत दावेमध्ये वादी यांनी नमूद केलेली विहिर ही दावा मिळकतीमध्ये आहे किंवा प्रतिवादी यांचे म्हणणेप्रमाणे ती सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ यामध्ये आहे, हा याकामी वादाचा विषय आहे. कारण, उभय पक्षकार हे सदर विहिरीवर आपलाच हक्क असलेचे जरी नमूद करत असले तरी त्याबाबत उभय पक्षकार यांनी कोणताही पुरावा याकामी दाखल केलेला नाही. तसेच वादीतर्फे दाखल केलेली कागदपत्रे म्हणजेच दावा मिळकतीचा ७/१२ उतारा (नि.६) जरी पाहिला तरी त्यामध्ये कोणतेही विहिरीची नोंद दिसून येत नाही. त्यामुळे आजमितीस दावा मिळकतीमध्ये विहिर अस्तित्वात आहे किंवा कसे ? हे दाखविणेकरीता कोणताही पुरावा न्यायालयासमोर नाही. सदर बाब ही अंतिम पुरावेअंतीच सिध्द होणारी आहे. त्यामुळे त्याबाबत आजमितीस कोणताही मनाई आदेश करणे येथे उचित होणार नाही.

९)		असे जरी असले तरी, दावा मिळकतीस लागून असलेले सर्व्हे नं.५४, हिस्सा नं.५ या मिळकतीमधील ५ गुंठे क्षेत्राबाबत प्रतिवादी यांनी वाद उपस्थित करुन नि.दि.मु.नं.२८/२०१४ हा दाखल

केलेला असलेने व त्या मिळकतीतील इतर क्षेत्र व दावा मिळकत (विहिर वगळता) ही वादी यांचेच मालकीकब्जाभोग्याचे असलेचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असलेने, वादी यांचे म्हणणेप्रमाणे त्यांचे कब्जेभोग्यास प्रतिवादी यांनी हरकत–अडथळा केलेस निश्चितपणे वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणारे आहे.

१०) मी ही बाब देखील येथे नमूद करतो की, वादी यांचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकतीचे त्यांचे कब्जाभोग्यास प्रतिवादी नं.१ याने हरकत–अडथळा केला व त्यास प्रतिवादी नं.२ ते ५ यांची फूस आहे. परंतू, प्रतिवादी नं.२ ते ५ यांची फूस कशी व कोणत्याप्रकारे आहे अगर त्यांनी वादी यांना कशाप्रकारे हरकत–अडथळा केला याबाबत आजमितीस कोणताही पुरावा न्यायालयासमोर नाही. त्यामुळे सध्यस्थितीत त्याबाबत कोणताही निष्कर्ष येथे काढता येणार नाही व ते वादी यांचे कब्जाभोग्यास हरकत–अडथळा करत आहेत, असे म्हणता येणार नाही.

११) सबब, येणेप्रमाणे वरील सर्व परिच्छेदामधील नमूद कारणमिमांसेचा विचार केला असता सदरचा दावा हा सकृतदर्शनी वादी यांचे अंशत: लाभात दिसून येत असलेने तसेच न्यायाचे समतोलत्व देखील वादी यांचे बाजुने झुकत असलेने व वर नमूद केलेप्रमाणे वादी यांचे कब्जेभोग्यास प्रतिवादी यांनी हरकत–अडथळा केलेस निश्चितपणे त्यांचे अपरिमित असे नुकसान होणारे असलेने मुद्दा क्र.१ ते ३ यांचे निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदविले आहेत.

१२) **<u>मुद्दा क्रमांक ४ करिता</u> :–**

मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्षावरुन वादी यांचा सदरचा अर्ज अंशत: मंजूर होणेस पात्र असलेने सदर मुद्देचा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज अंशत: मंजुर करणेत येत आहे.

२. सदर दावेचा अंतिम निर्णय होईपर्यत प्रतिवादी नं.१ अगर त्याचेतर्फे इसमांनी वादग्रस्त विहिर वगळता दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जाभोग्यास कोणतेही प्रकारे हरकत अथवा अडथळा करु अथवा करवू नये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकीद देणेत येत आहे.

३. या अर्जाचा खर्च मुळ दावेचे खर्चाचे कामी समाविष्ट करणेत यावा.

**वेंगुर्ला.** **( दि. स. झंवर )**
**दि.१३/०६/२०१६.** **दिवाणी न्यायाधीश(क.स्तर) वेंगुर्ला.**